# माया

आपल्या लेकीच्या हातातल्या त्या दोन महिन्याच्या बाळाकडे बघून सुशीलाबाई बोलल्या, "अगं काय इतका विचार करतेस, जा उद्यापासून तू ऑफिसला. मी सांभाळीन हो माझ्या नातीला." त्या वेळेस कोणती वेळ होती माहीत नाही पण नियतीने त्यांचे बोल अक्षरश खरे केले, थोडीथोडकी नाही तर तब्बल त्या नातीचे लग्न होईपर्यंत त्यांचा आणि तिचा गोफ कायमचा विणला गेला.

दादरच्या दुर्गाप्रसादच्या दोन खणी चाळीत आणि बारा माणसांमध्ये तो दोन महिन्यांचा जीव अलगद सामावून गेला. काय नव्हते त्या घरात ? प्रेम करणारे आजी आजोबा, लळा लावणारे मामा, मावशी, आणि जिव्हाळ्याचे शेजारी ! आपली लेक तिच्या संसारासाठी नोकरी करते याची पूर्ण जाणीव त्यांना होती म्हणून भक्कमपणे त्यांनी नातीला सांभाळायचा निर्णय घेतला.

वय आणि वेळ कोणासाठीही थांबत नाहीत. दादरच्या प्रसिद्ध बालमोहन विद्यामंदिर शाळेमध्ये तिच्या शिक्षणाचा श्रीगणेशा झाला आणि बघता बघतां त्या शाळेत ती रमून गेली. दर सुट्टीत आई बाबांकडे राहायला जाणे हाच काय तो तिचा आणि सुशीलाबाईंचा विरहाचा काळ ! पण नातीला सुद्धा आजीला सोडून जास्त दिवस राहावत नसे. नातीपाठोपाठ त्यांचा नातूही आजीकडे राहायला आला. त्यांच्या लेकीचे मात्र कशासाठी पोटासाठी चालूच होते.

पोटच्या गोळ्यांना दूर ठेवून नोकरीसाठी केलेली तिची वणवण कामी आली आणि त्यांच्या लेकीने ठाण्याला मोठी जागा घेतली. तसेच आपल्या मुलांना तिथे घेऊन जाण्याचेही ठरवले, आता खरी कसोटीची वेळ होती. तोपर्यंत बरेच पाणी पुलाखालून वाहून गेले होते. आपली दोन मुले, आपला नवरा आणि धाकट्या मुलीचा जावई यांचे डोळ्यादेखत झालेले मृत्यू सुशीलाबाईंनी पचवले होते पण नातवंडांवरचे त्यांचे प्रेम मात्र कायम होते. शेवटी तिची लेक त्यांना आपल्या घरी ठाण्याला घेऊन आली.

उतारवयातल्या सुशीलाबाईंना अखेर देवाने दिलेला हा न्याय होता. त्यात लेकीच्या जवळच त्यांची लहान बहीण सुमनही राहायला आली होती. आता कुठे आयुष्य शांतपणे जगण्याची संधी त्यांना मिळाली आणी त्या आपल्या लेकीच्या संसारात रमून गेल्या. अजूनही तिची नोकरी चालू होती आणि अजूनही त्या आवडीने नातवंडांचे हट्ट पुरवत होत्या. असे काय होते त्यांच्याजवळ की त्या या सर्वातून निभावून गेल्या?

पुण्याच्या प्रसिध्द दिघे घराण्यातला त्यांचा जन्म. सर्व भावंडांत या मोठ्या, त्यामुळे भाचरांची ताईआत्या विशेष लाडकी ! आपलेपणा, माया, जिव्हाळा या सर्वांचा वारसा घेऊन त्या लग्नानंतर दादरला आल्या आणि स्वत:चा संसार करता करताच दिराचाही संसार आपलासा केला. काही कारणास्तव दिराची नोकरी गेली पण त्यांनी पुतण्यांना मात्र उघड्यावर पडू दिले नाही. त्यांना मायेची पाखर घातली, इतकी की ते कालांतराने सुशीलाबाईंनाच आई म्हणू लागले. आयुष्यभर त्यांनी आईपण निभावले. कधी स्वतःच्या मुलांचे कधी पुतण्यांचे तर कधी नातवंडांचे ! त्यांची सगळ्यात मोठी शिदोरी म्हणजे सर्वांवर प्रेम करायची वृत्ती ! हीच शिदोरी त्यांना आयुष्यभर पुरली.

सुशीलाबाईंना स्वर्गवासी होऊन वीस वर्षे झाली पण आजही त्यांची नात त्यांच्या आठवणीने टिपं गाळते, तिच्या प्रेमाच्या गोष्टी आपल्या लेकाला सांगते.

तर अशी माझी आजी सुशीलाबाई रणदिवे हिची ही साठा उत्तराची कहाणी सुफळ संपूर्ण !!!!!!!

**शिल्पा इनामदार आर्ते**